# -:: प्रकरण - सहा ::-

## सैनिकी व्यवसाय

# प्रकरण - सहा

## सैनिकी व्यवसाय

### प्रास्ताविक :

शिवकालात व पेशवेकाळात इतर व्यवसायाप्रमाणे सैनिकी व्यवसाय हा देखील एक महत्वाचा व्यवसाय होता. शिवाजी राजानी जेंव्हा स्वराज्य बांधणीचे कार्य हाती घेतले होते त्यावेळी महाराष्ट्रातील अनेक लोक शिवाजीच्या या स्वराज्याच्या कार्यात सहभागी झाले होते. त्यात प्रामुख्याने मावळ्यांचा मोठा सहभाग होता.[१]

शिवकाळात मराठ्यांचे लष्करी बळ कमी असून त्याहून पुष्कळ पटीने मोठ्या असणा-या मुसलमानी सैन्यांशी सामना देण्याचा प्रसंग शिवाजीवर होता. मुसलमान सैन्यावर एकाएकी छापा घालून त्याचे नुकसान करण्यास व बाजु अंगावर आल्यास त्यांच्या पाठलागातुन झुकांडी देउन निसटुन जाण्यास घोडेस्वाराइतके चलाख साधन शिवाजी राजाना दुसरे नव्हते. म्हणून शिवाजी महाराजाना जरी आपल्या कामगिरीच्या सुरवातीस मावळे पायदलावर भिस्त ठेवावी लागली तरी हळुहळु त्यांनी घोडेस्वार वाढविले तेच त्यांचे धोरण त्यांच्या पुढील वंशजानी व पेशव्यांनीही आपल्या समोर ठेवले होते.[२]

पेशव्यांच्या सैनिकामध्ये घोडदल, पायदल, तोफखाना व हत्ती

हे चतुरंग सैन्य होते. सैन्यांच्या या चार अंगापैकी त्यांचा मुख्य भार हा घोडेस्वारावर होता. सैनिकी व्यवसायात घोडेस्वाराला महत्वाचे स्थान होते.

पेशवेकालीन घोडदल :

पेशवेकालात महाराष्ट्रामध्ये घोडेस्वाराच्या भरतीला अनुकुलता होती. महाराष्ट्रात कृष्णा, निरा, घोडनदी, भिमा, प्रवरा, गोदावरी, या नद्यांचे पाणी घोड्याना चांगले मानवणारे असल्याने त्या पाण्यावर पोसलेली घोडी बळकट, चलाख, व पाणीदार असत. निरथडी, गंगथडी, भिमथडी, प्रवरथडी अशा घोड्यांच्या जाती असून ती सर्व घोडी वरील गुणानी युक्त असत. नद्यांच्या काठी मोठाली चराऊ कुरणे असल्याकारणाने घोड्याना ते मानवणारे होते.[३]

हरीवंशाच्या बखरीमध्ये स्वाराविषयी म्हटंले आहे की, स्वारात, करोल, भालेकरी व आडहत्यारी असे विभाग होते. करोल म्हणजे बंदुकवाले, आडहत्यारी म्हणजे मिळेल ते हत्यार चालविणारे यामध्ये प्रामुख्याने बारगीर व शिलेदार असा भेद होता.

बा र गी र :

बारगिराचा घोडा सरकारी, हत्यार सरकारी व त्याला पगार सरकारी म्हणजे तो सरकारचा पगारी नोकर होय. बारगीराचा पगार हा माणुस पाहून चार रुपयापासून दहा रुपयापर्यंत असे. बरेच बारगीर

व घोडे एकत्रीत केले म्हणजे त्याची पागा बने व एका पागेत दहापासून सातशेपर्यंत घोडी असत व त्यांची पुन्हा सरदारात गणना होई. त्यांचा सर्व खर्च हा सरकारातून चाले. म्हणजेच एक पागा हे हजारो लोकांचे पोट भरण्याचे साधन होते.[४]

पागेकडे नौबत, निशाणा, पालख्या, फडणीस, पोतनीस, दरकदार, मशाली, शिगि, पाखाली, खासदार, नालबंद, दाणेकरी, जासुद, मारदी, फरास, डेरे, राहूटया, वैरण वहाणारी तट्टे, बैल, उंट, हत्ती, इत्यादींचा समावेश होत असे.[५]

शिलेदार :

बारगीराप्रमाणे शिलेदार स्वारातील महत्वाचा घटक होय. घराची घोडी घेऊन सैन्यात चाकरी करणारे ते शिलेदार होत. शिलेदारांचा पगार हा घोडे, माणुस व हत्यार पाहून दरमहा २० रुपयापासून ३० रुपयापर्यंत असे.[६]

शिलेदारात "एकांडे" शिलेदार हा एक लहानशा भाग होता. एकांडे शिलेदारात ब्राम्हण, मराठे, रजपूत, मुसलमान या जातीतील लोकांचा समावेश होत असे. एकांडे शिलेदाराचा फार उपयोग होई. त्याला वर्षाला वेतन मिळे. हे वेतन २५० रुपये पासून ४०० रुपयापर्यंत असे.[७] प्रसीध्द सखाराम हरी गुप्ते हा एकांडे शिलेदार होता.[८]

कित्येक शिलेदार छोटे असून त्याना आपल्या जवळ राऊत

बाळगावे लागत असत. पेशवे सांगतील त्या सरदाराजवळ त्याना चाकरी करावी लागे. त्याबद्दल त्यास सरंजाम असे. सरंजामदार मोठा असेल तर त्याला सरदार म्हणत असत. पटवर्धन, शिंदे, होळकर, विंचुरकर हे सारे सरदार होत. पटवर्धन सरदाराना २४ लाखाची जहागीर होती. दरस्वारास १०० रुपये.या हिशोबाने त्यानी आठहजार स्वार ठेवले होते.[९] या शिलेदाराच्या वापरात असलेले कांही कपडे तत्कालीन साधनावरुन दिसुन येतात. शिराच्या नाजुक भागाचे रक्षण व्हावे म्हणुन डोक्याच्या भागावर टोपी असे. चांगल्या कमावलेल्या कातडाची टोपी बनवुन त्यावर कापडाने शिवलेले असे गळ्यापासुन कमरेपर्यंत भागाचे रक्षण व्हावे अशी अंगरख्याची मांडणी असे अंगरख्याला बाहया नसत त्यामुळे भाला फेकण्यास व पट्टयाचे हात चालविण्यास अडचण येत नसे. सर्वात जास्त छातीची काळजी घेतली जाई.[१०]

शिलेदाराजवळ २५ ३ स्वार असत. शिलेदाराना आपले पथक घेऊन स्वारीवर निघण्याची आज्ञा होई. ते हजर न झाल्यास त्यांची घरे जप्त होत. परगणे व तालुके यावरील अधिकारी कमावीसदार, व मामलेदार यांच्या हाताखाली त्यांच्या आमलातील प्रदेशातील बंदोबस्तासाठी मैदानात पागा व किल्ल्यात शिंबदी असे.[११]

इ.स. १७४५ मध्ये रानोजी भोसल्याकडे ७०० लढाऊ बारगीर आणि शिलेदार होते. त्याचप्रमाणे राणोजी भोसल्याच्या पागेत इतर कामे करणारे अनेक लोक होते. त्यात उंटवाले, खिजमतगार, पाणी वहाणारे, न्हावी, माहूत, पोतदार, चांभार, झाडुवाले इत्यादी लोकांचा भरणा असे व त्यांना सहा आठवड्याचा पगार हा ३ रुपये होता.[१२]

[illegible]

इ•स•१७६४ च्या राक्षसभुवनच्या लढाईत अनेक शिलेदार व बारगीर जखमी झाले होते• अशा जखमी शिलेदाराना सरकारातून कांही मदत मिळे•[१३]

पेशव्यांच्या खाजगी पागेत काम करणारे अनेक जातीचे लोक होते• त्यात ३२३ महार, ५४ मांग, ५२ चांभार असे पुना, संगमनेर, पारनेर, राहूरी, खेड, जुन्नर, नेवासा, कर्डे, गदंपूर आणि बेलापूर इत्यादी पागामधून होते•[१४] शिलेदाराना आगाऊ कांही रक्कम दिली जाई• तिला "नालबंदी" म्हणत असत•[१५]

पेशव्यांच्या घोडदलातील चवथा भाग म्हणजे पेंढारी होत• पेंढारी हे एक लष्कराचे अंग होते• पेंढा-यांमध्ये मुख्य भरणा हा मुसलमानांचा असे• पेंढारी लोक सरकारची परवानगी काढून लष्करात रहात असत• त्यांना आपल्या प्रत्येक पालामागे पाच रुपये सरकारात भरावे लागत असत• त्या करारावर त्यास परवानगीची ढाल देण्यात येत असे• सन १७७१ मध्ये मिरखान व हसनखान पेंढारी यांना आपल्या जमावा सोबत गणेश गंगाधरच्या गोटाजवळ रहाण्याची परवानगी मिळाली होती• पेंढा-याना भरावा लागणारा कर म्हणजे पालपट्टी होय•[१६]

पेंढारी लोकांचा व्यवसाय म्हणजे लष्करात राहून लुटमार करुन आपले पोट भरणे होय• लढाईत शत्रुच्या पराभवाच्या वेळी त्याच्या फौजेची व छावणीची लूट सरकारचे सैन्य करी• त्याला पेंढा-याची मदत असे• पेंढा-याना मिळालेली लूट सरकारात द्यावी लागे•[१७]

नानासाहेब पेशव्यांच्या लष्करात पेंढारी हे एक सर्वसामान्य

असे अंग झाले होते. इ.स. १७५४ मध्ये दत्ताजी शिंद्यांच्या लष्करातील पेंढा-यांचा प्रमुख " दोस्त मोहमद " हा होता. पहिल्या माधवराव पेशव्यांनी तर आपल्या लष्कराला पेंढारी हा घटक जोडला होता. हे पेंढारी शत्रुचे गोटे लुटत असत. त्रिंबकराव ढमढेरे हा ५० पेंढारी कुटुंबाचा प्रमुख होता आणि ते सरकारला पालपट्टी म्हणुन ३% कर देत असत.[१८] अशा प्रकारे पेशवेकालातील पेंढारीविषयी माहिती मिळते.

पा य द ल :

इ.स.१७८७ मध्ये पेशव्यांकडे १ लाख घोडेस्वार आणि १०,००० पायदल व ४० ते ५० तोफा होत्या.[१९] पेशवाईन मराठयाजवळ मुख्य भरणा हा स्वाराचा होता. किल्ले वगैरे घेण्याच्या कामी पायदलाची गरज लागे. पायदलात फक्त महाराष्ट्रीयनांचाच भरणा असे असे नाही तर परप्रांतातील अनेक जातीतील अनेक धर्मातील लोकांचा भरणाही असे पेशव्यांचे सैन्यातील सर्वच गाडदी कवाईत शिकलेले असत असे नाही. पेशव्यांची सेनेत पठाण, सिध्दी, जाफर आणि सिलेमान, बुदाउन या लोकांना सामावुन घेतले होते.[२०] तसेच शीख, अरब, सिद्दी, आणि मराठेतरांचांही पेशव्यांच्या पायदलात भरणा होता, सन १७७१ मध्ये सुमेरसिंग नावाचा गाडध्यांचा एक अधिकारी होता आणि त्याचा महिन्याचा पगार १२ रुपये अथवा १३ रुपये होता. अलिमर्दन खान हा सुध्दा गारद्यांचा जमादार होता. आणि त्याचा महिन्याचा पगार हा १६ रुपयापर्यंत होता. त्यांच्याकडे असलेल्या गाडद्यांची संख्या ४०० होती.[२१] अरब शिपायांना महिन्याला १५ रुपये पगार दिला जाई. भारतातील शिपायाना ८ रुपये पगार दिला जात असे आणि सगळ्यात

खालच्या थरातील सैनीकाला ६ रुपये महिन्याचा पगार असे.[२२]

पेशवेकालात सैनिकाना द्यावा लागणारा पगार अर्धा रोख रक्कमेत आणि अर्धा कपडयाच्या स्वरुपात दिला जात असे. सेनापतीला बारामहिन्याचा पगार दिला जात असे. बारमाही चाकरी करुन दहा महिन्याचा अथवा अकरा महिन्याचा पगार दयावा लागे.[२३]

पेशवेकालात मुख्यत: सैन्य भरती ही मराठ्यातून होई. क्वचित डोंगरी, मंगगारुडी, वगैरे रानवट जातीतून सैन्य भरती केली जाई. सैनीकाला लष्करी शिक्षण दिले जाई. थोडे खडे सैन्य सोडून देता पावसाळ्यात सैन्यातील लोकांना शेतकामासाठी रजा मिळे. त्यांना विजयादशमीस सैन्यात दाखल व्हावे लागे.[२४]

पेशवाईत फौजेचा पगार नेहमी थकलेला असे. मागील पगार देण्याचा निकाल लागल्या शिवाय एकही स्वार दुस-या स्वारीवर जाण्यास खुष नसे. मराठी फौजांची चाकरी नेहमी आठमाही असे. श्रावणमहिन्यात शिलेदारांस " नालबंदी " मिळे. नालबंदी रुपये १२५ ची असे. सैनिकाना भाद्रपद महिन्यात स्वारीवर तयार होण्यासाठी पत्रे जात असत. त्यावेळी " रवानगी " म्हणून १० रुपये देत असत. पुन्हा आश्विन महिन्यात दस-याचे कापड म्हणून ५० आंरव अथवा रोख रुपये २५ मिळून रुपये १६० शिपायाना मिळत असत व सरकारात १४० रुपये बाकी राही. कार्तिक शुध्द एकादशीला घरातून निघून त्याच दिवसी लष्करात हजर व्हावे लागे. आणि हजर झालेल्या दिवसापासुन रोजमुरा सुरु होत असे. हा रोजमुरा आठवडयाचा ४ रुपये असे. तर कांही लोकांना

सातमहिन्याचा रोजमुरा ११२ रुपये मिळत असे. मोहिम संपल्यानंतर बाकीचे राहीलेले २८ रुपये पेहरावा अगर रोख पैशात मिळत असत. याप्रमाणे सरदाराने केलेला करार पूर्ण करुन सैनिक घरी जात असत.आणि पाऊस सुरु होण्यापूर्वी आपआपल्या घरची राहीलेली संसारीक कामे, शेतीची कामे, करीत असत. त्याच बरोबर घोड्याना विश्रांती मिळत असे.[२५]

वरील सर्व गोष्टीवरुन पेशवेकाळातील घोडदल आणि पायदल याना सैनिकी व्यवसायामध्ये किती महत्वाचे स्थान होते हे दिसुन येते. सैनिकी व्यवसायात आणखीण एक महत्वाचा घटक म्हणजे आरमार होय.

आ र मा र :

हिंदुस्थानात आरमारी विद्येची प्रगती मुळीच झालेली नव्हती. " जी कांही वापेची गलबते चालत ती फक्त मालाची ने आण करण्यासाठी व उतारुसाठी असत. भारताच्या पश्चिम किना-यावर मराठी भाषा बोलणारे जे प्रांत होते. कोळी, भंडारी व मुसलमान इत्यादी जातीचे लोक क्वचित हा धंदा करीत असत. पाण्यावरुन मरुन जाण्यासाठी जी गलबते तयार केली जात ती लाकडाची असत.[२६]

मराठी नौदलाचे जनकत्व ख-या अर्थाने शिवाजीराजाकडे जाते. शिवाजी नंतर कान्होजी आंग्रेकडे मराठी नौदलाचे अधिपत्य आले होते. परंतु या आंग्रेकुटुंबाचे आरमारावरील वर्चस्व पेशव्याना सहन झाले नाही. इ.स.१७५६ मध्ये नानासाहेब पेशव्यानी इंग्रजाच्या मदतीने तुलाजी आंग्र्याचा

पाडावा करुन आपले आरमार विजय दुर्ग येथे उभारले आणि आनंदराव धुळप यास आरमाराचे प्रमुखपद दिले.[२७]

पेशव्यानी आपले वेगळे आरमार सन १७३७ च्या सुमारास वसईच्या बाजूस आरनाळ्या जवळ स्थापीले होते. पेशवेकालीन आरमारामध्ये विजयदुर्ग, रत्नागिरी, अंजनवेल व देवगड येथील दालदी[२८] गावीत व भंडारी जातीचे लोक नौकानयनात निपुण होते.

" गुराबा " हे एक मोठे लढाऊ जहाज होते.[२९]

पेशव्याच्या आरमारात गुराबा, गलबते, मचवा, महागिरी, इत्यादी जहाजाचा समावेश होत असे.[३०]

विजयदुर्ग येथील मराठ्यांचे आरमार बलाढ्य होते. सर्वात मोठी जहाज हे फत्तेजंग असुन त्यावर २२६ माणसे, १७ गोलंदाज, १३२ दर्यावर्दी होते. आरमाराच्या कामगिरीत सावंतवाडीकर, धुळप, सुर्वे, कुवेशकर इत्यादी घराण्याचा समावेश होत असे.[३१]

शस्त्रास्त्रे :

सैनिकी व्यवसायात शस्त्रास्त्राना अत्यंत महत्वाचे स्थान होते. जवळच्या शत्रुपेक्षा अंतरावर असलेल्या शत्रुवर मारा करण्यासाठी किल्ल्याच्या संरक्षणासाठी व किल्ल्यावरुन शत्रुवर मारा करण्यासाठी शस्त्रास्त्राची गरज भासे; तोफा, बंदुका, यांचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असे.

पेषकबाज, कटीचार, जंबीचा, माडु, पट्टा, खंजीर, बच्चा, बिचवा, बाण, निरकमठा खांडा, पंचहत्यार, सोटा वाघनखे, निमच्या रेहकेला इत्यादी अनेक हत्याराचा वापर पेशवेकालीन सैनिकामधुन होत होता. इ.स.१७६४ मधील पेशव्याची राक्षस भुवन येथे निजामाशी झालेली लढाई आणि त्यावेळी वापरलेली शस्त्रे ही तलवार, भाला, दगड, बंदुका, बाण इत्यादी होती.[३२]

बाजीरावाच्या निजामउल्कशी झालेल्या पहिल्या संघर्षात निजामने तोफा वापरल्या होत्या. त्याच्याजवळ तोफाखाना होता. परंतु पेशव्याकडे तोफखाना नव्हता. म्हणुन त्यांनी त्याला तोंडदेण्या-साठी तोफखाना सज्ज करण्याचे ठरविले आणि तोफखाण्यावर यशवंतराव पाणसे आणि माधवराव पाणसे यांची नेमणुक केली. इ.स.१७५४ साली कुकडी नदीवर पेशव्याची लढाई निजामाबरोबर झाली. त्यावेळी पेशव्यानी तोफा वापरल्या होत्या.[३३] तोफामध्ये सुत्रनाळा, जेजाळा, गरनाळा, असे प्रकार होते.[३४] सुत्रनाला या उंटावरच्या तोफा असत आणि गरणाळा या किल्ल्यावरील तोफा असत. पुणे, रेवदंडा,जैनाबाद, सातारा, ग्वाल्हेर या ठिकाणी तोफा बनविण्याचे कारखाने होते. महाहजी अंबाजी पुरंदरे यांनी पेशवा बाजीराव व चिमाजी आप्पाला दिलेल्या पत्रात तोफा निर्मीतीचे तंत्र स्पष्ट केले होते.[३५]

इ.स.१७६९ सालात तोफाच्या कारखान्यात सुतार, लोहार, बाणाचे कारागीर, गोळ्याचा कारागीर, गोलंदाज, खलाशी, दर्यावर्दी, गाडीवान, बेलदार, घणकरी, जिणगर, भालदार, खासदार, बाणदार, शिंपी, परीट, कलाल इत्यादी लोकांचा भरणा होता.[३६]

किल्ले :

प्राचीन काळापासुन अगदी अधुनिक कालापर्यंत संरक्षणाचे साधन म्हणुन किल्ल्याचा वापर केला जात असे. किल्ल्यामुळे परचक्रापासुन होणारा धोका टळे. किल्ल्यावर संपुर्ण जबाबदारी ही तीन अधिकाऱ्यांची असे. हे अधिकारी म्हणजे हवालदार, सबणीस व कारखानीस होय. डॉ.सेनच्या मते हवालदार हा मराठा असे, सबणीस हा ब्राम्हण असे[३७] व कारखानीस प्रभु असे.

किल्ल्याच्या संरक्षणाची व्यवस्था ही रामोशी, भिल्ल, कोळी, यांचेकडे असे. या लोकाना जंगलाच्या वाटा, रात्रीच्या जागरणाची सवय असल्या कारणाने हे लोक किल्ल्याच्या संरक्षणाची काळजी घेत असत.[३८] अशाप्रकारे रामोशाचा किल्ले रक्षणाचा देखील व्यवसाय होता. मराठा, ब्राम्हण व प्रभू जातीचे लोक किल्ल्यात नोकरी करुन देशरक्षणाचे महत्वाचे काम बजावत असत.

-x-x-x-x-x-

संदर्भ :

१. Sen S.N., Administrative System of the Marathas, P.77.

२. भावे वा.कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ.४१६.

३. कित्ता.

४. हरिवंशाची बखर, पृ.८, तळटीप

५· कित्ता, चिटणीस बखर, पृ·८२·

६· कित्ता·

७· भावे वा·कृ·, पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ·४१८·

८· हरिवंशाची बखर, पृ·३१, तळटिप·

९· भावे वा·कृ·, पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ·४१९·

१०· पुरंदरे कृ·वा·, पेशवाईतील घोडेस्वाराची टोपी व अंगरखा, भा·इ·सं·मं·, व·४, अंक १, शके १८४५·

११· वाड ग·चि·, पे·रो·, खं·९, पृ·२९८·

१२· Sen S.N., Military System of the Marathas, P.81.

१३· Ibid - 82.

१४· Ibid.

१५· Ibid.

१६· वाड ग·चि·, पे·रो·, खं·९, पृ·३३७·

१७· भावे वा·कृ·, पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ·४२९·

१८· Sen S.N., Military System of the Marathas, P.P.88-89.

१९· Ibid, P.77.

२०· भावे वा·कृ·, पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ·४२३·

२१· वाड ग·चि·, पे·रो·, खं·९, पृ·३३६·

२२· Sen S.N., Military System of the Marathas,P.P.79,80.

२३· Sen S.N., Administrative System of the Marathas,P.388.

२४. ढबु दा.गो., आंग्रे घराण्याचा इतिहास, पृ.३४३.

२५. दिघे वि.गो., मराठेशाहीतील लष्कर, पृ.१३५.

२६. चापेकर , आरमारी शब्दाबद्दल माहिती, भा.इ.सं.मं. अं.१, खं.१७, पृ.६३.

२७; बेंद्रे आ.वी., युध्दशास्त्र, यंत्र व तंत्र, पृ.७१,७२.

२८. भावे वा.कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ.४३२, वाड९,पृ.३३९.

२९. भावे वा.कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ.४३९.

३०. भावे वा.कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ.४३२.

३१. जोशी प्र.त.,(सं), आज्ञापत्र, पृ.८०.

३२. वाड ग.चि., पे.रो., खं.९, ले.३४३.

३३. कित्ता, पृ.४२४.

३४. वाड ग.चि., पे.रो., खं.९, पृ.३२४.

३५. सरदेसाई, पे.द., खं.१७, पृ.२७.

३६. वाड ग.चि., पे.रो., खं.९, पृ.३३५, भावे ,पे.म.पृ.४२६.

३७. Sen S.N., Siva Chhatrapati, P.P. 29,30.

३८. Sen S.N., Military System of the Marathes, P.105.


=0=0=0=0=0=